कुंभार समाज

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव
## (खनिकर्म शाखा)

ई-मेल – jalgaondmo@gmail.com फॅक्स नं. ०२५७-२२२०५००

क्रं/गौणख/ई-कावि/२०१८/८/२६/789 दिनांक :26/7/२०१८

**परीपत्रक**

शासनाने कुंभार समाजाच्या व्यक्तींना वीटभट्टी व इतर पारंपारीक व्यवसायांसाठी ५०० ब्रासपर्यंत मातीसाठी स्वामित्वधन माफ करूनही तहसिल पातळीवर स्वामित्वधन भरणेसाठी आग्रह धरला जातो अशा तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत, तसेच प्रत्येक तहसिल पातळीवर वीटभट्टी परवानगी देण्याची पध्दत वेगवेगळी असल्याने जिल्हयातील कुंभार समाजाच्या व्यक्तींना त्रास होत असल्याबाबतही अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या पदाधिका-यांनी निवेदन दिलेले आहे. जळगाव जिल्हयात वीटभट्टी परवानगी देण्याच्या पध्दतीत सुसुत्रता यावी तसेच पारंपारीक कुंभार समाजाच्या व्यक्तींना शासनाने दिलेल्या सवलतींचा लाभ मिळणेस सुलभता यावी याकामी तहसिल पातळीवर वीट भट्टीस परवानगी देणे आणि माती उत्खनन व वाहतुकीचे परवाने देणेच्या कार्यपध्दतीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देणेत येत आहेत.

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २१ जुलै २०१४ अन्वये १८ वर्षावरील कुंभार समाजाच्या सज्ञान व्यक्तीने ओळखपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यास त्यासोबत देण्याबाबत जातीचा दाखला, आधारकार्ड, रेशन कार्ड व रहीवासी दाखल्याची स्वयं सांक्षाकित प्रत व दोन फोटो जोडून तहसिल कार्यालयात सादर केल्यास सात दिवसात तहसिल कार्यालयकडून सदर व्यक्तीस कुंभार समाजाचा असल्याचे ओळखपत्र देण्यात यावे.

२. वीट व्यावसायिक ज्या वाहनाने माती वाहतुक करणार असेल त्या वाहनाव्यतिरीक्त् दुस-या वाहनाने माती वाहतुक करताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.तसेच ज्या जागेचा परवाना प्राप्त झालेला आहे त्याजागे व्यतीरीक्त इतर जागेत उत्खनन केल्यास किंवा परवानाधारकास मंजूर जागेव्यतिरीक्त दुसरीकडेच वाहतूक केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी व त्यांचा परवाना रदद करण्यात येऊन दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

३. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचेकडील पत्र क्रं.एसईएसी-२०१५/प्र.१८४/ता.क.२ दि.२६ ऑगस्ट २०१६ मध्ये नमूद केले नुसार महाराष्ट्र राज्यातील पारंपारिक विटभटटया (स्थान निश्चिती व

उदयोग उभारणी धोरण)२०१६ नुसार कोणतीही वीटभट्टी ही राष्ट्रीय राजमार्ग,राज्यमार्ग एक हजार वस्तीच्या गावापासून २०० मीटर अंतरावर असणे बंधनकारक आहे. या निर्बधाचे कसोशीने पालन करणेत यावे. या निकषात न बसणा-या वीटभट्टया तात्काळ बंद करणेत याव्यात.

४. जे विटभट्टीधारक (९X ४X६) इंच आकाराच्या एका वेळेस २५ हजार व (९X ४X३) इंच आकाराच्या एका वेळेस ५० हजार विटा लावतील अशा विटभटटी धारकास महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. मात्र त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या वीटभटटी लावणा-या वीटभटटी धारकास महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

५. वीटभट्टीसाठी परवानगीचे अर्ज तहसिलदार कार्यालयात स्वीकारणेत यावेत. अर्जदाराने ज्या ठिकाणी वीट व्यवसाय करणार त्या जागेचा ७/१२ उतारा जोडावा. जागा दुस-याची असल्यास ११ महिन्यासाठी जागा विटभटटी व्यवससाया साठी देत असल्याचे संमतीपत्र जमीन मालकाकडून घ्यावे. अर्जात राष्ट्रीय राजमार्ग,राज्यमार्ग तसेच एक हजार वस्तीच्या गावापासून असलेल्या अंतराचा अंदाजे उल्लेख असावा. तसेच कुंभार समाजाचा असल्यास ओळखपत्र जोडावे. अर्जात (९ X ४ X ६) इंच आकाराच्या आणि (९ X ४ X ३) इंच आकाराच्या एका वेळेस किती विटा लावणार याचा उल्लेख असावा. मुद्दा क्र. ५ मध्ये नमूद केलेनुसार आवश्यकता असल्यास महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाचा नाहरकत दाखला जोडावा. अर्जामध्ये किती चौरस मीटर जागेचा वापर विटभटटीसाठी करणार याचा उल्लेखकरावा. अकृषिक अर्ज प्राप्त नंतर ७ दिवसात सदर अर्ज तलाठी यांचेकडेस चौकशीसाठी पाठवावा. तलाठी यांनी वीट व्यावसायिक वापरणार असलेल्या जागेची पाहणी करून चौकशी अहवाल द्यावा. तलाठी यांनी राष्ट्रीय राजमार्ग,राज्यमार्ग तसेच एक हजार वस्तीच्या गावापासून असलेल्या अंतराचा स्पष्ट उल्लेख अहवालात करावा. तसेच वीटभट्टीधारक किती चौ.मी. जागेचा वापर करणार आहे याचाही अहवाल द्यावा. तलाठी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अकृषक आकारणी भरण्याचे पत्र वीटभट्टीधारकास द्यावे. अकृषक आकारणी भरून घेतल्यानंतर ११ महिन्यासाठी वीटभट्टी परवानगी देणेत यावी. वरील कार्यवाही कोणत्याही परीस्थितीत २१ दिवसात पूर्ण करावी. वीटभट्टीधारक यांनी पावसाळा संपलेवर तात्काळ त्यांचे परवनागी अर्ज दाखल करावेत.

६. कुंभार समाजाच्या व्यक्तींनी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१जुलै २०१४ मधील नियम ५ अन्वये स्वामित्वधन न देता ५०० ब्रास पर्यंत माती उत्खनन परवानगी मिळणे बाबत तहसिल कार्यालयाला अर्ज

जागा मालकाचे संमतीपत्र, ग्रामपंचायत नाहरकत दाखला,पेसा हददीतील गाव असल्यास ग्रामसभेचा ठराव जोडणे आवश्यक आहे. राजपत्रात लिहील्याप्रमाणे माती उत्खननासाठी धरणे,तलाव,नदीपात्र, सरकारी जागा यातून माती उत्खननासाठी संबधित विभागाची नाहरकत घेतल्या नंतर सदर माती उत्खनन परवाना देण्यात यावा. माती उत्खनन परवान्याची मुदत देताना उत्खननाचे ठिकाण ते वाहतूक करण्याचे ठिकाण याचा विचार करून एका दिवसात किती खेपा होतील या अनुषंगाने परवान्याची मुदत देणेत यावी.

७. कुंभार समाजाच्या व्यक्तींना दिलेल्या मोफत माती परवान्याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता तहसिलदार यांनी घ्यावी.

वरील परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करणेत यावे.

**अपर जिल्हाधिकारी जळगांव**

**प्रति,**
**तहसिलदार** ---------------------------------
**उपविभागीय अधिकारी** ---------------------------------

**प्रत :** अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था जळगाव /-
सर्व कुंभार समाजाच्या व्यावसायिकांना वरील परीपत्रकाचे काटेकोरपणे पालन करणेबाबत कळवणेत यावे.

**अपर जिल्हाधिकारी जळगांव करीता**

## कुंभार समाजास माती उत्खनना करीता परवानगी देणे बाबत अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा तपशिल | | |
|---|---|---|
| अ.क्र. | | |
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड नं.सह) | |
| ३ | आधार क्रंमांक | |
| ४ | व्यवसाय | |
| ५ | भ्रमणध्वनी क्रं. | |
| ६ | पॅन कार्ड क्रंमांक | |
| | विट भटटी स्थळाचा तपशिल | |
| ७ | विट भटटी लावण्याचे स्थळ | |
| ८ | विटभटटीचे राष्ट्रीय महामार्ग,राज्यमार्ग आणि गावापासूनचे अंतर | |
| ९ | गट नंबर | |
| १० | क्षेत्र | |
| ११ | अकृषक क्षेत्र | |
| १२ | माती उचल करण्याचे स्थळ | |
| १३ | माती उचल करण्यासाठी आवश्यक कालावधी | |
| १४ | विटभटटी स्थळ ते माती उचल स्थळांचे अंतर | |
| १५ | विटभटटी क्षमता | |

| | | |
|---|---|---|
| १६ | विट चा आकार | |
| १७ | माती वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणा-या वाहनांचे प्रकार व क्रमांक | |

स्वघोषणापत्र----

मी------------------------------- श्री.------------------------------------------------यांचा मुलगा / मुलगी वय---------वर्षे , व्यवसाय----------------------------------राहणार---------------------------------------------यादवारे घोषित करतो /करते की वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास , भारतीय दंड संहिता १९६० कलम १९९ व २०० व अन्य / संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन , याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक अर्जदाराचे नांव

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

१. जातीचा दाखला
२. आधार कार्ड
३. कुंभार कार्ड
४. रहिवासी दाखला
५. जागा मालकाचे संमतिपत्र
६. जागेचा ७/१२ उतारा (उत्खनन स्थळ व विटभटटी स्थळ)
७. दोन फोटो
८. रेशन कार्ड
९. ज्या वाहनाने माती वाहतूक करणार त्या वाहनाचा क्रंमांक
१०. आवश्यक तेथे महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी
११. ग्रामपंचायत नाहरकत दाखला
१२. पेसा हददीतील गांव असल्यास ग्रामसभेचा ठराव
१३. माती उत्खननासाठी धरणे,तलाव,नदीपात्र संबंधीत विभागांची नाहरकत